
# उन्मेष

२०१८-१९




शेगांव शिक्षण संस्था, शेगांव द्वारा संचालित

## सेठ ग.भि. मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय, शेगांव


**प्रकाशक**
प्राचार्य, सेठ ग.भि. मुरारका कला वाणिज्य
महाविद्यालय, शेगांव, जि. बुलडाणा

**अक्षर जुळवणी**
सौ.प्रियंका लोडम
गोकुळ कॉलनी, अकोला

मुद्रक
**मुक्ता ग्राफिक्स् अँड पब्लिकेशन**
रणपिसे नगर चौक, अकोला
मो. : ९८५०४७१५२०

**विद्यार्थ्यांच्या वितरणाकरिता**

**प्रकाशन वर्ष**
२०१८-२०१९



श्री संत सद्गुरु गजानन महाराज, शेगांव



स्व.श्रीमान सेठ पुरणमलजी मुरारका
संस्थापक
शेगांव शिक्षण संस्था, शेगांव



श्रीमान सेठ मुरारीलालजी चतरभुजजी मुरारका

अध्यक्ष

शेगांव शिक्षण संस्था, शेगांव

# अनुक्रमणिका


- संपादकीय
- प्राचार्यांचे मनोगत
- संपादकीय मंडळ
- कार्यकारी संचालक मंडळ, शेगांव शिक्षण संस्था, शेगांव समिती
- स्थानिक व्यवस्थापन समिती, शेगांव शिक्षण संस्था, शेगांव ग. भि. मुरारका कला व वाणिज्य महाविद्यालय, शेगांव
- साहित्य विभाग

१) श्रम संस्कार शिबिरातील माझा अनुभव
२) महापुरूष डॉ. बाबासाहेब
३) वेदना
४) सैनिक
५) आई
६) अशीच आहे मी
७) मैत्री कशी असावी
८) आधार
९) आई
१०) विश्वाने पुजियेला
११) लोकचेतना के महाकवी संत तुलसीदास
१२) भावना
१३) ज्ञानेश्वर महाराजांची काव्यदृष्टी
१४) मानवतावाद
१५) श्री संत गजानन महाराज
१६) वैदर्भीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे व उपाय
१७) मनाच्या जीर्ण डोहात
१८) अभ्यास मंडळ अहवाल
१ ) इतिहास २ ) वाणिज्य
३) अर्थशास्त्र ४) राष्ट्रीय सेवा योजना
५) शारीरिक शिक्षण विभाग

# संपादकीय

वाचन, लेखन आणि अभिव्यक्ती ही मानवी सजिवांच्या विकासप्रणालीमध्ये महत्वाची भूमिका बजावणारी त्रिसूत्री होय. असे म्हटले तर वावगे ठरू नये. कारण माणूस हा त्यामुळेच निसर्गात उजवा ठरला हे विसरता येणार नाही. कारण निसर्ग घटकांचा विचार केला तर अनंत जीव या सृष्टी चक्रामध्ये जन्माला येतात ती कधी उपद्रवी तर कधी निरूपद्रवी या नात्याने परिचितही होवून जातात. परंतु कुठल्याही इतिहासाच्या पानाला ते वजनदार करून जात नाहीत. तुलनेत माणवप्राणी इतिहासाचा विषय होतो व इतिहास घडवतो ते त्याच्याजवळ असणाऱ्या विचार शक्तीनेच ना? त्या विचारांना आणखी प्रवाही करण्याच्या प्रवाहाचा त्या हलकासा बिंदू होण्याचा आमच्या 'उन्मेष' या वार्षिकांकाचा प्रयत्न आहे.

व्यक्तीविकास हा समाजाला अभिप्रेम असणारी सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया होय. व्यक्ती समाजघटक म्हणून समाजाच्या परिवर्तनाची चाहूल ओळखायला लागतो, तेव्हा तो त्याच समाजातील माणसापेक्षा वेगळा ठरतो. कारण त्याच माणसाकडून गाज मुक्त अपेक्षा करीत राहतो. त्याआधी त्याला त्याच्या तोलामोलाचा व्हावे लागते तरच तो चिंतनीय होतो. महाविद्यालयातील प्रत्येक धडपडणारा [illegible] आपल्या अस्तित्वाला शोधू पाहतो. स्वतः व्यक्त होवू पाहतो. हे सर्व करतांना तो अडखळतो, पडतो कधी विव्हळतो कधी संपल्याच्या निर्णयापर्यंत पोहचतो अशा तरूणाला आपल्या ठिकाणी असणाऱ्या जोरकस प्रतिभेच्या बळावर जीवनाची वास्तवता हेरण्याची संधी 'उन्मेष' देतो. त्याला समाज जीवनाकडे समर्थपणे पाहण्याची आशावादी दृष्टी देतो. त्याने व्यक्त व्हावं यासाठी त्याला 'उन्मेष' सारखं विचारपीठ मिळावं म्हणून हा महाविद्यालयाचा महत्वाचा उपक्रम.

या सत्रामध्ये जे विद्यार्थी प्रविष्ठ झालेत अशा सर्व विद्यार्थ्यांना ( कला वाणिज्य) आपले वैचारिक ललित, लेख, कविता, चारोळी इ. साहित्यासह आम्ही आमंत्रित केले आहे आणि विशेष म्हणजे आमच्या या हाकेला विद्यार्थ्यांनी प्रतिसादही दिला. त्यांच्या पाऊलखुणा या 'उन्मेष' वार्षिकांकामध्ये पडलेल्या दिसतात. यासाठी आमच्या शेगांव शिक्षण संस्था शेगांवचे संचालक आदरणीय श्रीमान सेठ संजयकुमारजी मुरारका यांच्या प्रेरणा सदैव सोबत असतातच त्यामुळेच एक नवी उर्जा आम्हाला मिळते. आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय श्री राम पांडे सर यांच्या मार्गदर्शनाने उत्साह संचारला व कार्य तडीस गेले. तसेच महाविद्यालयातील प्रा. व शिक्षकेत्तर मित्रपरिवार यांनी दिलेल्या योगदानामुळे आपला 'उन्मेष' आकाराला आला. धन्यवाद !

**–संपादक मंडळ**

# प्राचार्यांचे मनोगत ...

आमचे ग. भि. मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय, शेगांव जि. बुलडाणा हे ग्रामीण भागामध्ये वसलेले महाविद्यालय आहे. ग्रामीण भागातील मुलांचा ओघ उच्च शिक्षणासाठी सातत्याने आमच्या महाविद्यालयामध्ये येत असतो. सामाजिक बांधिलकीच्या भावनेने आम्ही या सर्व मुलांच्या भविष्याबद्दल सातत्याने जागरूक राहण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यासाठी आम्ही त्यांच्या अभ्यासक्रमाच्या पूर्णतेबरोबरच त्यांच्या अंगातील सुप्त गुणांना कसा वाव दिल्या जाईल या दृष्टीने वेगवेगळ्या शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन आम्ही महाविद्यालयामध्ये वर्षभर करीत असतो. त्यांच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सातत्याने झटत असतात. त्यातीलच एक महत्वाचा उपक्रम म्हणजे 'उन्मेष' हा महाविद्यालयीन वार्षिकांक होय.

अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या ठिकाणी जाणवणाऱ्या लेखन कलेला लक्षात घेवून यावर्षी त्यांच्याकडून स्वलिखित साहित्य मागितले. ते कथा, कादंबरी, कविता, चारोळी, व्यंगचित्र यांच्या स्वरूपात त्याला विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. या सर्वांना 'उन्मेषच्या' माध्यमातून एक आकार देण्यात आला. आमच्या या प्रयत्नांना सतत उर्जा, एक प्रेरणा देण्याचे कार्य आमच्या संस्थेचे अध्यक्ष श्रीमान शेठ मुरारीलालजी चतरभुजजी मुरारका करीत असतात. तसेच आमच्या संस्थेचे संचालक श्रीमान सेठ संजयकुमारजी मुरारीलालजी मुरारका यांचे मार्गदर्शन आम्हाला नवी दिशा देत असते. यांच्या प्रोत्साहनाने आणि महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या प्रयत्नाने हा उन्मेषचा अंक आपणासमोर ठेवत असतांना आनंद वाटतो. तरीही काही उणिवा राहिल्यास त्या आमच्या मर्यादा समजाव्यात. या उन्मेषचे वाचक– अभ्यासक स्वागत करतील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

धन्यवाद !

आपला

प्राचार्य

ग. भि. मुरारका कला वाणिज्य

महाविद्यालय, शेगांव

शेगांव शिक्षण संस्था, शेगांव

ग. भि. मुरारका कला व वाणिज्य महाविद्यालय, शेगांव

# संपादक मंडळ

प्राचार्य डॉ.अनिलकुमार राठोड

प्रा.डॉ.व्ही.एन. इंगळे

प्रा.डॉ.व्ही.एम. डेहनकर

प्रा.डॉ.व्ही.के.गायकवाड

प्रा.कु.एन.एस.राजगुरू

●●●

# श्रम संस्कार शिबिरामधील माझा अनुभव

●●

कु.लक्ष्मी इंगळे
बी.ए.प्रथम

●●

प्रत्येक व्यक्तीला जीवनात अनेक प्रकारचे अनुभव येतात कधी चांगले तर कधी वाईट प्रत्येक व्यक्तींच्या जीवनात अनुभवाला काही वेगळेच स्थान असते. अनुभव माणसाला काही वेगळे घडविण्याचा प्रयत्न करीत असतात. माणसाच्या जीवनात चांगले अनुभव आले असतील तर तो खुप आनंदी असतो. आणि वाईट अनुभव आले असेल तर तो खुप दुःखी होत असतो. याकरिता माणसाच्या जीवनात दोन्ही प्रकारचे अनुभव आले म्हणजे तो दोन्ही अनुभवातून काहीना काही शिकण्याचा प्रयत्न करीत असतो.

माझ्या मते तर व्यक्ती आपल्या जीवनात आलेल्या चांगल्या अनुभवापेक्षा वाईट अनुभव जास्त स्मरणात ठेवत असतो. पण, माझ्या मते व्यक्तींनी दोन्ही अनुभव सारख्याच प्रमाणात आपल्या स्मरणात ठेवावेत.

माझा अनुभाव एवढ्या चांगल्या प्रकारचा आहे की, तो मी कधीच विसरणार नाही आणि विसरण्याचा प्रयत्न सुद्धा करणार नाही. आपल्याला असे वाटते की, शहरातील स्त्री – किंवा पुरूष हेच शिकत असतात. पण असे नाही खेड्यापाड्यामध्ये पण अनेक चांगल्या प्रकारचे शिकलेले वृद्ध आपल्याला दिसतात. यावरून आपल्याला लक्षात आलेच असेल की, माझा अनुभव हा खेड्या पाड्यातील आहे. होय मित्रांनो । माझा अनुभव हा खेड्यापाड्यातीलच आहे. तो म्हणजे एका ७५ वर्षीय स्त्रीचा. ज्या वेळी मी या स्त्रीला भेटले तेव्हा त्या स्त्रीचे वय ७५ वर्ष होते. आणि त्या स्त्रीचा अनुभव म्हणज त्या स्त्रिने आपल्या दुसऱ्या वर्गातील वह्या ह्या एवढ्या व्यवस्थीत जपून ठेवल्या होत्या की, एखादा सोन्याचा किंवा चांदीचा हांडाच होय.

हा अनुभव माझ्या जीवनात अविस्मरणीय आहे. त्या स्त्रीला मी आजी या नावाची उपमा देईल. कारण, त्या माझ्या आजीच्या वयाच्या होत्या. मित्रांनो त्यांचे अक्षर तर विचारूच नका, अहो मोत्याप्रमाणे त्यांचे अक्षर आणि त्यांनी सर्वांना शिकविण्याचा सुद्धा प्रयत्न केला. त्यांना दुसऱ्या सावित्रीबाई फुले म्हणण्यात हरकत नाही. त्या स्वतः सांगतात की, मी सावित्रीबाई एवढे चांगले

कार्य तर केले नाही पण, त्यांच्यातल्या काही चांगल्या गोष्टींना माझ्या जीवनात, आचरणात आणण्याचा प्रयत्न केला व काही अंमलबजावणी पण करेल. त्या आजींनी दुसरी मध्ये असतांना लिहलेला पाळणा त्यांनी आम्हाला सांगितला. त्यावेळेस मात्र आम्ही थक्कच झालो, तो पाळणा खालील प्रमाणे होय.

**"माता अनुसया हालवी पाळणा निज**
**दत्तात्रया निंद्रा लागू दे तनया।।''**
**कर्म भूमीची यक्षणी देवता ।**
**संकोणी डंकोनी नेली**
**पाळण्याची मांडणी,**
**गणपती सरस्वती उमापती अषृदेव**
**यांनी माता अनुसया हालवी पाळणा'**

अशा सुंदर प्रकारचा पाळणा त्यांनी आम्हाला म्हणून दाखविला. त्यावेळेस मात्र माझ्या मनात एक मोठाच विचार आला तो म्हणजे कुणी तरी म्हटले आहे की, दगडात पण देव दिसतो. ही म्हण कितपद सत्य आहे हे यावरून आपल्याला दिसून येते.

या अनुभवातून मला तर वाटते की, त्याकाळचे शिक्षण हे आजच्या काळातील विद्यार्थ्यांना लाजावणारे आहे. आणि असे दिसून येते की, त्या काळी पण शिक्षणाला किती महत्व आहे. अशा प्रकारचा माझा अनुभव आहे.

# सुविचार

- सन्मित्र हीच जगातील श्रेष्ठ संपत्ती आहे.
- शरीराला जसा व्यायाम, तसे मनाला वाचन.
- विद्या ही कामधेनूसारखी असते.
- चारित्र्याचा विकास हेच खरे शिक्षण.
- कविता हे सर्व ज्ञानपुष्पाचे उत्तर आहे.
  क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे.
- मनुष्य आपले दुःख हसून घालवितो पण रडत वाढवतो.
- विद्वत्तेपेक्षा सुस्वभावाला अधिक महत्व आहे.

— कु. अश्विनी पहुरकर
बी. ए. भाग १

# महापुरूष डॉ. बाबासाहेब

युगपुरूष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रिल 1891 रोजी महू येथे झाला. महू हे गांव आज मध्य प्रदेशातल्या इंदूर या गावापासून वीस–बावीस किमी अंतरावर आहे. पण त्यावेळी ते राजपुतान्यात होतं. इंग्रजानी हळूहळू भारतात जम बसवल्यावर ठिकठिकाणी कायम स्वरूपाच्या लष्करी छावण्या निर्माण केल्या होत्या. महू हे गांव अशाच लष्करी छावणीचं गांव होतं.

6 डिसेंबर 1656 ची काळरात उजाडली. बाबासाहेबांचे महानिर्वाण झाले. निर्वाणापूर्वी त्यांनी 'बुद्ध आणि त्याचा जन्म धम्म' या ग्रंथाचा उपोद्घात लिहून ठेवला होता. तो त्याच्या शेजारी असलेल्या टेबलावर होता. दोन पत्र लिहून पूर्ण केली होती. एक आचार्य अत्रे यांना आणि दुसरे श्री म. जोशी यांना लिहिलेले. ती पत्रही त्याच टेबलावर होती.

महापुरूषांच्या आयुष्यातसुद्धा किती नाट्यपूर्ण योगायोग येतात. बाबासाहेब म्हणायचे धम्म आणि राजकारण ही माझ्या रथाची दोन चाकं आहेत. अगदी अखेरच्या क्षणी बाबासाहेबांनी काय लिहावं तर आपल्या धम्मग्रंथाचा उपोद्घात आणि नव्या राजकीय पक्षाची बांधणी कशी असेल ह्या विषयी आपली अपेक्षा असरी पत्र साऊथबरो आयोगासमोर दिलल्या साक्षीपासून म्हणजे १६१६ पासून बाबासाहेबांचा राजकीय प्रवास सुरू झाला आणि प्रबल विरोधी पक्ष असावा असं स्वप्न पाहता या प्रवासाची इतिश्री झाली. मॅट्रीक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर बाबासाहेबांना केरूस्कर गुरूजींनी बुद्ध चरित्र आशीर्वाद म्हणून भेट दिले होते. बाबासाहेबांनी मधल्या अडीच वर्षाच्या काळात लोखंडी पडद्यालय दूर सारून बुद्धाच्या तत्वज्ञानाचं आजच्या वर्तमानाला दर्शन घडवलं.

बाबासाहेबांचे महानिर्वाण झाले. बहिष्कृतांच्या भारतात जणू भूकंप झाला. सर्व राजकीय नेत्यांना धक्का बसला. बाबासाहेबांच्या निधनाच्या प्रतिक्रिया आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रकट झाल्या. बाबासाहेबांच निधन दिल्लीत झालं होतं. खास विमानानं त्यांच पार्थिव मुंबईला आणण्यात आलं. बाबासाहेबांच्या या महायात्रेत अफाट जनसागर उसळला होता. दादर चौपाटीवर सागराच्या उसळण्याच्या लाटा आणि त्या अलीकडे जनसागरच्या अश्रूंचा महापूर याच्या साक्षीनं

बाबासाहेबांच्या पार्थिवाला अग्नी देण्यात आला. तिकडे सांची येथे बुद्ध जयंतीचा उत्सव चालू होता. त्या समारंभात अखेरचा दिवस होता तोही 7 डिसेंबर 1956 हा आणि इकडे दादर चौपाटीवर बाबासाहेबांचे पार्थिवही बुद्धतत्वात विलीन होतं तेही याच दिवशी. बाबासाहेबांचं आयुष्य एक वास्तव महानाट्य होतं. कल्पना करता येणार नाही अशा संघर्षानं भरलेलं. या महानाट्याचा शेवटही किती अर्थपूर्ण योगायोगानं होत होता.

बाबासाहेब कशा विरूद्ध लढले? काय होतं त्यांच्या जीवनाचं सार? कोणता अखेरचा संदेश त्यांच्या बोलण्या–वागण्यातून आमच्यापर्यंत पोहचला? का म्हणायचं त्यांना युगपुरुष?

आपल्या समाजात असे होते जिथे माणसे जन्मानं श्रेष्ठ–कनिष्ठ ठरत होती. जन्माने कुणी श्रेष्ठ–कनिष्ठ ठरत नसतो हा बाबासोबांचा संदेश होता. प्रत्येक व्यक्ती जन्मानं अमूकतमूक म्हणून त्या व्यक्तीला व्यवसायचं स्वातंत्र्य नव्हतं, सर्वच क्षेत्रात सारख्या संधी नव्हत्या. प्रत्येक व्यक्तीमात्राला समान संधी मिळावी असं बाबासाहेबांच ठाम मत होत. नव्हे ही अशी समान संधी मिळेल अशी तरतूद आमच्या राज्यघटनेत असली पाहीजे असं बाबासाहेबांना वाटत होते. अशी घटनात्मक तरतूद होईपर्यंत बाबासाहेब लढले. त्यात त्यांना यशही मिळालं. ही तरतूद म्हणजे एका बाजूने या देशातील कोट्यावधींना विकासाची संधी होती आणि दुसऱ्या बाजूने बलशाली राष्ट्राच्या निर्मितीची हा आरंभही होता.

दोन हजार वर्षांच्या प्रवासात समाजातील काही घटक अगदीच मागे पडले होते. म्हणून समाजातल्या अशा घटकांना प्रगतीच्या एका रेषेवर आणायचं तर काही काळ अशा दुर्बलांना द्यायला हवा. विशेष संधी यासाठी हवी काही काळ आरक्षणाची तरतूद बाबासाहेबांनी ही तरतूद उपलब्ध करून दिली.

बाबासाहेबांनी जो विचार पथदर्शक म्हणून स्विकारला त्यानुसार बाबासाहेबांना हवं होतं, 'जातीविहिन समाज रचनेवर आधारलेलं नवं राष्ट्र' जातीचं अस्तित्व कायम ठेवून समरसतेवर आधारलेलं राष्ट्र नको तर जिथे जाती वितळून गेल्या आहेत अशा समतेवर आधारलेलं राष्ट्र त्यांना हवे आहे, 'मी आरंभी भारतीयआहे आणि अंतीही भारतीयच आहे', अशी ओळख प्रत्येकाला देवू शकतील असं राष्ट्र. बाबासाहेबांचा ध्येयवाद अतिशय दिर्घ प्रवासानंतर आणि खूप कष्टानंतर अस्तित्वात येवू शकेल. आजच्या नव्या पिढीसमोर हे आव्हान उभे आहे. कोणता मार्ग पत्कारायचा? एका नव्या युगाचा स्विकार की आंधळेपणाने पुन्हा मागच्या युगाकडे माघार? बाबासाहेबांचे चरित्र पुनः पुन्हा वाचायचं असते ते याच प्रश्नाचं उत्तर आपल्याला मिळावं म्हणून यापैकी कोणता मार्ग राष्ट्राच्या हिताचा? या प्रश्नाचं नेमकं उत्तरे म्हणजे बाबासाहेबांच्या जीवनाचं सार.

# वेदना

खरचं तुला या वेड्या जीवाचे प्रेम नाही कळले
मी तुझ्या हृदयातील ठोके व ठोके जाणले
पण तुला या वेड्या जीवाचे प्रेम नाही कळले
फक्त तुझ्या प्रेमासाठीच मी या सर्व जगाला सोडले
खरच तुला ...

माझ्या हृदयातील मंदिर तू मोडले
माझ्यासाठी तुच एक आधार होतीस
खेळ प्रितीचा नाही कळला
क्षणाचीत जे घडायचे नव्हते तेच घडले
खरच तुला ...

अगं जगाने कितीती सांगितले
तरीही ऐकायचे असते ते मनाचे असते.
दुसऱ्याच्या सांगण्यावरून मन दुखवायचे नसते
तेवढे सांगूनही तुझे पाऊले त्या दिशेने ओढले.
खरच तुला ...

विसरतीलस ना तु मला
कसे पटवून देवू या वेड्या मनाला
प्राण गेले तरी वेदना होतात गं मनाला
प्रार्थना ही माझी कुणाची दृष्ट न लागो
तुझ्या सुखी संसाराला.

हृदयाला दिल्या वेदना
तेवढ्या तू घेवून जा
उध्वस्त झालेल्या घरट्याला
एकदा तरी पाहून जा.

– आकाश चुने
बी.कॉम द्वितीय

# सैनिक

शत्रूशी युद्ध करतात
देशाला वाचवतात
जीवाला जीव देतात
आमचे सैनिक ।।१।।

आई–बापास मुकतात
देशाचे रक्षण करतात
संकटातून आम्हा सोडवतात
आमचे सैनिक ।।२।।

वर्षानुवर्षे सिमेवर राहतात
कुटुंबाची दुःखी पत्रेही वाचतात
तरीही देशासाठी प्राण वेचतात
आमचे सैनिक ।।३।।

शत्रूला तेच नमवतात
युद्धे करून जिंकतात
देशाची शान राखतात
आमचे सैनिक ।।४।।

घरची श्रीमंती सोडतात
तीरंगा उंचावर फडकवतात
देशासाठी शहीद होतात
आमचे सैनिक ।।५।।

– अमर शिरसाठ
बी.कॉम. द्वितीय

# आई

घड्याळाचा काटा क्षणाक्षणांनी
युगे मागे टाकत गेला
नभातले रंग बदलतांना
माणसातला माणूस आटत गेला
मात्र आईच्या ममतेमुळे विश्वाचा
पसारा टिकत गेला।।

माणूस वाटला गेला देवा धर्मावरून
तरी ममता वाटली जात नाही
फरक फक्त इतकाच होतो की,
रहीम म्हणतो अम्मा अन
राम म्हणतो आई।।

अंतर्मनी बसवून ब्रम्हांड सारे
आईच्या कुशीत विसावतो कान्हा
देवकीच्या दुधाने जळाला तरी
मातृत्वाने ओलावते यशोदेचा पान्हा ।।

तिची अंगाई अंगाई लतादीदीचा तो गळा
हातातल्या त्या दोरीला साऱ्या विश्वाचा लळा
राम रहीम नसे तिच्या ममतेपुढे वेगळा
थेंबभर तिच्या दुधापेक्षा नसे अमृतकुंभ वेगळा।।

यशोदेच्या अंगणी खेळतो श्याम
कौसलेच्या पदराआड लपतो राम
आईच्या मांडीवर नीज येता
हरकेस लाभतात चारी धाम।।

आई तुझ्या प्रेमवर्णनाने...
अमृतासम भिजला कागद
आनंदश्रुसम ओघळली
आई तुझे उपकार असे आई
जन्मोजन्मी फिटणार नाही।।

— शुभम बाठे
बी.ए.प्रथम

# अशीच आहे मी

खरचं मी कशी आहे?
मनाला प्रश्न पडतो नेहमी
विचार केल्यावर उत्तर मिळतं
अशीच आहे हो मी ।।१।।

तशी मी आहे बरीच बोलकी,
सारखी बडबडत असते
पण नवीन कोणी भेटलं
की माझी दातखिळ बसते ।।२।।

आपल्याच कोशात गुरफटायला
मला फार आवडत
गर्दी गोंधळ असला की
कासवं व्हायला परवडतं ।।३।।

मी हसते नेहमी खुप
जीवनाचा आनंद घेते खास
पण राग येतो जास्त
करतो व्यक्तिमत्वाचा ऱ्हास ।।४।।

आहे आत्मविश्वासाची कमी फक्त
करू शकते मी काम काही
सारखी मनात भीती असते
मला हे जमेल की नाही ।।५।।

माहीत नाही मला खरचं ।
चांगली की वाईट मी
मात्र मी माझ्याशी प्रामाणिक
अशीच आहे हो मी ।।६।।

— शिवाणी हिंगणे
बी.ए.प्रथम

# मैत्री कशी असावी?

सागरासारखी विशाल
मनासारखी नाजूक
कोकीळेच्या आवाजासारखी गोड
जीवनालाही असावी
नेहमी मैत्रिची जोड
मनातील गोष्टी सांगायला
ती एक जागा आहे
ती कधीच तुटत नाही
तो अतुट धागा आहे
मैत्रीच दूर करते
आपण कोणतीही आपत्ती
अरे ! तिच्यापुढे फिकी पडे
ही सारी धनसंपत्ती
प्रथम चालू काट्यावरं
गुलाब कसं बनावं ?
हे केवळ आपण
मैत्रिकडून शिकावं
दुःखाला सामोरे जायचे
हे मैत्री शिकविते.
एक आदर्श व्यक्ती फक्त
मैत्रिमुळेच बनते.
प्रत्येकाला प्रथम दुःख आलं पाहिजे
कारण दुःखानंतरच
सुख काय असते?
ते समजते
मैत्री नसावी नावाची
मैत्री असावी मनाची
किंवा दुसऱ्याची
कधी न तुटणारी
जीवाभावाची
विश्वासावर आधारलेली
मैत्री नसावी घाबरलेली
वेळेवर तुटणारी
मैत्री असावी खरी मरणोत्तर साथ देणारी

**— राधा भिसे**
बि.कॉम. १ वर्ष

0 0 0

# आधार

हृदयाला होणाऱ्या जखमा भरण्यासाठी
हवा असतो मायेचा पदर कुणाचातरी
हवा असतो वात्सल्याचा पिसारा
जेव्हा हरवावेसे वाटते, कुणासाठीतरी
अडखळतील जेव्हा पाऊले वाटेल कधीतरी
आधाराचा हात हवा असतो कुणाचा
तरी कुणाच्यातरी सावलीत हसून
करावासा वाटतो वेडेपणा कधीतरी
वाऱ्याशी स्पर्धा करतांना देखील
सीमा हव्यातच कुठल्यातरी
मनाची साद ऐकतांना कुणाचातरी
असावा लागतो संवाद आपल्याच मनाशी तरी
घेतांना कुणाच्यातरी शपथा
ठेवावा लागतो विश्वास कुणावर तरी

**—आकाश गवई**
बी. कॉम. २

# 'आई'

'आई' या दोन शब्दांत
सामावले विश्व
तिचं प्रेम मिळालं नाही तर
येतात डोळ्यात आसवं.
'आ' म्हणजे असते
आभाळमय मन तिचं,
कळीचं उमललेलं फुल जसं,
लेकरासाठी आपल्या
काहीही करणारी
संकटकाळी नेहमी
साथ देणारी
अशी ही आई
कधीही आपल्या लेकराचं
चांगलच पाही
ई म्हणजे ईश्वर
जणू आई असे
ऊसाची साखर
आईची जागा आहे
विश्वात प्रथम
म्हणून तिला
सगळे करतात नमन,
प्रत्येकाच्या जीवनात
आई असणं
किती किती छान आहे
नाहीतर हे जीवन म्हणजे
नुसतच वाळलेलं रान आहे
काही जण असतात असे
की, जे स्वार्थी असतात.
आपल्या स्वार्थापोटी
ते आईला मारतात
काही तर... आई मिळावी म्हणून
मनोमन झुरतात
आई ही आहे
सर्वात सुंदर
तिच मोठ्ठ हृदय
आहे एक मंदिर
कुणाजवळ कधीही
असायला नको स्वार्थ
आई नसेल कुणाला
तर त्याच जीवनं
बनते व्यर्थ

**–गणेश पवार**
बी.कॉम. द्वितीय

# विश्वाने पुजियेला

00

**प्रा. विलास एम. डेहणकर,**
ग. भि. मुरारका महाविद्यालय,
शेगाव जि. बुलडाणा

00 00

भारत भूमी ही संतांची भूमी आहे. या भूमीमध्ये विदर्भात 'यावली' नावाचे छोटेशे गांव आहे. या गावी 30 एप्रिल 1909 ला ब्रम्हमुहूर्तावर एका महामानवाचा जन्म झाला. हा महामानव म्हणजे बाल माणिक उर्फ देवबाबा उर्फ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे होय. बाल माणिकचे गुरू श्री आडकोजी महाराज हे होय. प्रेमाने बाल माणिकला ते तुकड्या नावाने संबोधायचे. पुढे जनमाणसी तुकड्यादास हेच नांव त्यांना मिळाले.

महाराजांचे शिक्षण फक्त चौथी पर्यंत झाले होते. ते स्वयंसिद्ध पुरूष होते. वयाच्या नवव्या वर्षीच ते घराबाहेर पडले. रामटेक, ताडोबा, गोंदुडा, रामदिघी, अरण्यात त्यांनी तपश्चर्या केली. तेंव्हा लोक त्यांना देवबाबा म्हणून ओळखू लागले होते. पुढे इ.स. 1935 साली सालबर्डी येथे महारूद्र यज्ञ त्यांनी केला तो इतिहास प्रसिद्ध आहे. या यज्ञामुळे स्वातंत्र्य सैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. त्यामुळे त्यांची किर्ती भारतभर पसरली की, इ.स. 1942 च्या स्वातंत्र्य आंदोलनात त्यांनी उडी घेतली. चिमूर, आष्टीचा प्रसिद्ध स्वातंत्र्य संग्राम त्यांनी चेतवीला होता. आपल्या खंजेरी भजनाद्वारे त्यांनी संपूर्ण भारत जागविला होता. खंजेरी भजनामुळे बाल, तरूण, वृद्ध, स्त्री, पुरूष या सर्वांमध्ये विरश्री संचारत होती. यामुळे जनजागृती होत होती. याचा प्रत्यक्ष अनुभव ब्रिटीश सरकारला आला होता. त्यामुळे त्यांनी इ.स. 1942 मध्ये तुकडोजी महाराजांना नागपूर व नंतर रायपूरच्या कारागृहात बंदीस्त केले होते.

15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारत बलशाली भारत होवो, हे त्यांचे स्वप्न होते. यासाठी ग्रामोन्नतीकडे त्यांनी आपले लक्ष केंद्रीत केले होते. अतिशय धावत्या दौर्‍यात त्यांनी 150 गद्य पद्य ग्रंथ लिहिले. ते ग्रंथ हिंदी व मराठी भाषेत आहेत. जीवन विकास हाच आशय या ग्रंथात आहे. ग्रामगीता हा त्यातील मुख्य ग्रंथ होय. हा ग्रंथ आजच्या युगाची संजीवनी बुटी मानल्या जातो.

**खरे काम निष्काम ही ग्रामसेवा।**
**झटू सर्वभावे करू स्वर्ग गावा।।**

हा ग्रामोन्नतीसाठी त्यांचा मूलमंत्र होता. स्वातंत्र पूर्वकाळ व स्वातंत्रोत्तर काळातील त्यांचे कार्य वाखाणण्याजोगे होते. त्यांच्या कार्याने प्रभावित होवून भारतीचे महामहीम राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी त्यांना राष्ट्रसंत या नावाने गौरवीत केले. इ.स. 1954 मध्ये त्यांना हा गौरव देण्यात आला होता.

इ.स. 1955 मध्ये 'जपान' येथे विश्वधर्म व विश्वशांती परिषद आयोजित करण्यात आली

होती. या परिषदेमध्ये भारतातर्फे महाराजांना प्रतिनिधी म्हणून पाठविण्यात आले होते. तेथे महाराजांचे चरण स्पर्श होताच जोरदार पावसाला सुरूवात झाली होती. बरेच दिवसापासून तेथे पाऊस नव्हता. तेंव्हा महाराजांचे चरण स्पर्श हा एक शुभशकुणच आहे. अशी भावना जपानच्या लोकांची झाली होती. महाराजांनी तेथे आपल्या मनमिळाऊ स्वभावाने सर्वांना वेड लावले होते. अन्य देशांचे प्रतिनिधीही त्यांच्याकडे आकर्षित होत होते. या परिषदेचे अध्यक्षस्थान सर्वानुमते महाराजांकडे देण्यात आले होते. भारतासाठी ही एक गौरवशाली बाब होती. आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वामी विवेकानंदानंतर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी विश्वशांतीचा संदेश जगला दिला. विश्वशांती परिषदेसाठी जमलेल्या १८ राष्ट्रांच्या धर्म प्रतिनिधींनी महाराजांच्या दिव्यत्वाची प्रचिती आली. त्यामुळे त्यांनी लगेच महाराजांना जेष्ठ सल्लागार म्हणून नियुक्त केले. यावेळी सर्व राष्ट्रांचे प्रतिनिधी त्यांचे समोर नतमस्तक झाले. या थोर संतांच्या कार्यामुळे विश्वातील थोरा–मोठ्यांनी पुढील शब्दात गौरद्‌गार काढले.

**माझ्या जीवनात मी महाराजांइतके प्रभावी भाषण अजून ऐकले नाही.**

–महान साध्वी चियाको होनजी, अध्यक्षा, सत्यवादी संस्था, जपान

या महाव्यक्तीचे उद्‌गार सर्व जगाला विश्वशांतीची योजना व अध्यात्माची दृष्टी देण्यास समर्थ आहेत. यांचे ज्ञान शाब्दिक नाही, स्वयंस्फूर्त आहे. म्हणूनच सर्व राष्ट्रांच्या धर्मगुरूंनी या भारतीय संताचे विचार उपयोगात आणले पाहिजे.

**– ई. कर्क, ब्रिटन**

अशी व्यक्ती मी जीवनात प्रथमच पाहात आहे. भाषा येत नसताही आपल्या निर्मळ मनमिळावू स्वभावाने, नैसर्गिक ज्ञानाने आणि खंजिरीच्या माधुर्याने जपानलाच नव्हे तर अन्य देशाच्या प्रतिनिधींनाही या महात्म्याने वेड लावले आहे. माझ्या हृदयाला नवे डोळे दिले आहेत.

**– मिस फ्रान्सिस काझार्ड, अमेरिका**

जगात शाब्दिक विद्वान अनेक मिळतील, पण आध्यात्मिक व स्वयं प्रेरणेचे पुरूष विरळाच ! धार्मिकतेच्या अधिष्ठानांवर सर्वांगीण संशोधित विचाराचे दर्शन आम्हाला या राष्ट्रसंतांचे ठायीच घडले! त्यांची बालसुलभ वृत्ती, बंधुत्वाची वागणूक व उच्च विचार पाहतो ते भारतातील अत्यंत श्रेष्ठ अग्रणी आहेत याची साक्ष पटते.

**– संत योनीसुके नाकानो, जपान.**

पंचम विश्वधर्मपरिषदेत आलेल्या प्रतिनिधीमध्ये संत तुकडोजी महाराज यांनी आपल्या उच्च शिलाने, अप्रतिम बुद्धिमत्तचे व श्रेष्ठत्वाने लोकांवर विशेष छाप पाडली ! माझ्या मते ! भारताचे खरे उद्धारक व महात्मा गांधीप्रमाणे महाप्रभावी ठरतील !

**– शिन निगामी, अध्यक्ष, आंतरराष्ट्रीय धर्मसभा, जपान.**

प्रतिदिनी मला भारतात नवनवीन आणि परिणामकारक अनुभव आले, त्यात श्रीसंत तुकडोजी महाराज यांची सामुदायिक प्रार्थना तर सर्वाधिक प्रभावी अशी होती. मला तीत भाग घेता आला ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे... त्यामुळे ज्याअर्थी आमची अंतःकरणे सर्व जीवमात्राच्या मूल उगमाकडे केंद्रीत झाली होती. त्याअर्थी आमची अंतःकरणे उन्नत आणि विशुद्ध झाली.

**– ए. सी. बर्मींग्टन, न्यूझीलंड**

श्री संत तुकडोजी महाराजांचे सेवाग्राम येथील अपूर्व भजनापासून मला अवर्णनीय असा आनंद झाला.

**– प्रो. ओ. रीडीबेक, स्वीडन**

श्री संत तुकडोजी महाराज आणि त्यांचे साथीदारांचे भजन ऐकून मला फार आल्हाद वाटला. हा भजनाचा माझे अंतःकरणावर गंभीर परिणाम झाला. या भजनातील जिव्हाळा थेट आत्म्यालाच स्पर्ष करतो आणि संगीताची स्फूर्तिमय संगती आतून आनंदाच्या लहरी सहजगत्या उसळविते असे अनुभवास आले. या आनंदलहरी, सार्वत्रिक पसरलेल्या दुःखमय वातावरणात देखील निर्माण होतात आणि जीवनाचे महान तत्व प्रकट करीतात. हे या भजनाचे खरोखरीच महान वैशिष्ट्ये आहे.

**– मार्डेकाय जॉन्सन, अमेरिका.**

एका प्रसिद्ध पाश्चिमात्य कवीने म्हटले आहे की, संगीत ही विश्वाची वाणी आहे. स्वदेश डल्या दिवसापासून जी जी गीते मी आजपावेतो ऐकली त्या सर्वाहून श्रीसंत तुकडोजी महाराजांच्या संगीताने सत्याचा मला जास्तीत जास्त प्रत्यय आणून दिला.

**– जेनेट रॅकीन, न्यूयार्क**

महाराज जपानमध्येच रहावे अशी जपानी लोकांची इच्छा होती. यासाठी जपानमधील काही जमीन देण्याचा त्यांचा मनोदय होता. पण सर्व नाकारून भारत भूमीच्या सेवेसाठी महाराज भारतात परत आले. ग्रामगीतेतील त्यांचे विचार आदर्श जीवन जगण्यास अतिशय पोषक आहेत. उपयुक्त अशी ग्रामगीता सर्व भाषेत उपलब्ध व्हावी यासाठी महाराष्ट्र शासनाकडून प्रयत्न होत आहेत.

विश्वाने पुजिलेल्या थोर राष्ट्रसंतांच्या कार्याचे विस्मरण अशक्य आहे. भारतभूमीची अखंड सेवा करून दि. 11 ऑक्टोंबर 1968 ला गुरूकुंज 'मोझरी' येथे त्यांनी आपली जीवनयात्रा संपवली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे आमच्या भूमीचे भूषण आहे. अशा या थोर राष्ट्रसंतास त्रिवार अभिवादन !

# लोकचेतना के महाकवी सन्त तुलसीदास

00
**प्रा. कु. एस. के. बालापुरे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख ग.भि. मुरारका
आर्टस कॉमर्स कॉलेज, शेगांव
00 00

मध्ययुगीन भारत की सम्पूर्ण चेतना को मार्मिक कवी की वाणी मे अभिव्यक्ति देनेवाले भारतीय संस्कृति के परम निष्ठावान तथा उदात्त भावनाशील जीवन द्रष्टा महाकवी गोस्वामी तुलसीदास भारत के सबसे बडे लोकनायक, समन्वयवादी चित्नक कहे जाते है। अपने सम्पूर्ण मानवीर अह, सम्पर्ण निष्ठा सम्पूर्ण कामनाभाव को आधार बनाकर हिन्दी काव्य सृजन को सर्वोच्च शिखरपर प्रतिष्ठित करनेवाला भारतीय भाषाओ में ऐसा कोई दूसरा कवी अब तक नही हुआ । लोकशास्त्र, परिवार व साधना भक्ती व ज्ञान, भाषा और संस्कृतिक, निर्गुण व सगुन ब्राम्हण व चाण्डाल, पाण्डित्य व पाण्डित्य के समन्वय का प्रतिरूप उनकी 'रामचरितमानस' रचना प्रारंभ से अंत तक इसी बात का प्रमाण देती है। तुलसी प्रतिभा का एक अलौकीक पक्ष है। तुलसी महानता का प्रमाण प्रस्तुत करनेवाली यह कृति जाति–पाँति के सांस्कृतिक कठघरे से परे जाकर हमेशा जीवन्त व क्रियाशील बने रहने के लिए एक प्रामाणिक मिसाल देती है। इस अर्थ में यह कृति एक शाश्वत मूल्यो की 'अमर कृति ञ कही जा सकती है। सामान्य साहित्य उस युग की समस्याओं को अभिव्यक्त कर समाप्त हो जाता है पर 'रामचरित मानस' के समान विशिष्ट साहित्य युगो युगो के लिए सबल संकेत दे जाता है।

संत तुलसीदासजी के बारह प्रामाणिक ग्रन्थ माने गये है। इन समस्त स्वनाओ में तुलसी रामकथा के प्रमुख पात्रों मे वे मानवता का व्यवहारिक रूप प्रस्तुत करते है। तुलसी का मानस समस्त उत्तरी भारत को वह जीवन–प्रेरणा देता है, जो मानवता की कल्पना मे उदारता, क्षमा, त्याग, धैर्य और सहनशीलता आदी सामाजिक शिवत्व के गुणा को पराकाष्ठा से मिला देता है जो बिल्कुल व्यावहारिक भी है।

**भक्ती की लोकरंजनकारी प्रेरणा–**

लोकमंगल व लोकचेतना से प्रेरित और सामन्ती, मानवी संबंधो की विरोधी चेतना से अनुशासित तुलसीदासजी एक भव्य चरित्र के

स्व में 'राम' की अवतारणा करते है। इस राम के मे साधारण जनता एक तरफ अपना तारणहार ढूंढती रही तो दूसरी तरफ सत्ताधारी वर्ग ने भी अपने सायन्सी मानव सम्बन्धो के समस्त मूल्यमानो व आदर्शोको प्रतिफलीत होते देखा । तुलसी ने इन दोने को मध्य वह आदर्श उपस्थित किया, जो शील, शक्ति व सौंदर्य से समन्वित राम के शक्तिशाली आदर्श के रूप मे जनता के सामने उपस्थित किया है। उन्होने साम्प्रदायिक वैमनस्य को भी दूर किया। तुलसी द्वारा निसपित भक्ती ज्ञान की महत्ता स्वीकृत हुई है । यथार्थ व आदर्श का, आध्यात्मिक और भौतिकला का अपूर्ण संतुलन भी स्थापित हुआ ।

**समता पर आधारित भक्ति का विचार**

तुलसी के दार्शनिक समन्वयवादी दृष्टीकोन के मूल मे समता पर आधारित भक्ति का विचार ही प्रधान है। धर्म व दर्शन का उत्तम समन्वय तुलसी की भक्ति भावना के मूल मे है। उन्होने राम से शिव की पूजा करायी है और शिव को राम से श्रेष्ठ बताया है। लोक प्रचलित मंगलकारी ईश्वर के सभी रूप तुलसी को वंदनीय थे। उन्होने अपने युग की आवश्यकताओं को भलिभांति समझा । 'रामचरित मानस' मे जिस भक्ति का प्रतिपादन उन्होने किया वह एक और शास्त्रीय और 'शबरी' की सहजभक्ति भी है जो सुगम – साध्य और आचरण– कुशलता का फलरूप है।

तुलसी ने शास्त्रीय भक्ति की राम के मुख से लक्ष्मण के प्रति अरण्यकाण्ड मे कहलायी है। तुलसी ने 'मानस' की रचा 'लोकशिक्षा' के उद्देश को लेकर ही की थी । परम्परा व प्रयोग का ऐसा सुन्दर समन्वय अन्य किसी सन्त और कवी मे नही मिलना । प्राचीन, वर्तमान व भविष्य मे मानव के विकास की, उसके कल्याणमय जीवनकी इतनी सुंदर स्वस्थ, संवेदना सम्पूर्ण भक्तिकाल की ही चिरन्तन प्रेरणा है।

आज साम्प्रदायिकत्व के बढते प्रभाव मे जन–जीवन का अस्थिर हो जाना स्वाभाविक है तुलसी का समाजवाद लोकधर्म व मर्यादा पालन मे आस्था बनाये रखता है। सामाजिक जीवन मे व्यवस्था बनाने रखने के लिए उन्होने वैयत्तीक जीवन मे आश्रमधर्म को लाया । सामाजिक संतुलन की भूमिका मे वे स्त्री–पुरुष समानता का विचार प्रधान मानते है। नारी के सदाचार से समाज का, संवर्धन संभव है। इस तथ्य पर उनका विश्वास था।

तुलसी के दशरथ व राम पुरानी व्यवस्था के राजपुरूष भले ही है किन्तु उन्हे तुलसी आधुनिक लोकतांत्रिक भावना के अनुरूप बताते है । सिता, हनुमान, भरत, कौशल्या इनके चरित्र जिस प्रकार तुलसी प्रस्तुत करते गये है वे आज के संदर्भ में हमे प्रेरणा देते है। सीता का चरित्र नारी के साहस, हृदता व शक्ति का प्रतिक है। कौशल्या का चरित्र ममत्व, वात्सल्य और कर्तव्यनिष्ठता का ज्वलंत उदाहरण है। भरत का चरित्र त्याग, समर्पण, कर्तव्य निष्ठता और प्रेम का उदाहरण है । कर्तव्यनिष्ठता का सबसे उत्तम उदाहरण हनुमान का चरित्र है।

आज के संघर्षशील युग मे ऐसे चरित्रो की बडी आवश्यकता है जो दुराभिमान शून्य होकर निस्वार्थ भाव से लोकसेवा व कल्याण का कार्य करे ।

तुलसी समाज के समग्र ढांचे का विचार करते है । वे नेता व मुखिया को समाज का मुख मानते है । जैसे मुख से सारे शरीर का परिचय होता है, उसी तरह नेता राष्ट्र का प्रतिक होता है। वह समाज के सुख–दुःख का अनुभव कर उनकी तथा राष्ट्रधन की रक्षा करते है। तुलसीदास 'कराधान सूर्यप्रणाली' का प्रतिपान करते है ।

आज विश्व की सबसे बडी समस्या है पर्यावरण की । प्राचीन काल से ऋषि मुनियो ने पर्वतपूजा, नदी पूजा वृक्षपूजा के प्रावधान पर्यावरण रक्षा के लिए नितान्त अनुकूल थे। जडता चेतनता की रक्षक होती है । व्यर्थ की वस्तु नही पशुपक्षी मानव के सहयोगी है। जिनके बिना जीवन निरस हो जायेगा। तुलसी की यह समन्वयवादी दृष्टी मानव व प्रकृति के बीच के सनातन सम्बधो पर की प्रकाश डालती है।

इस प्रकार, तुलसी काव्य में अन्तख्याल मौलिक तत्व है 'समन्वय भाव' उन्होने अपने साहित्य के सभी क्षेत्रो मे इसी तत्व का अवलंब किया है। तुलसी हमारे सामने विचारक, भक्त, कवि तीनस्पो मे अद्वितीय है। एक विचारक के नाते तुलसी शैव व वैष्णवों के मतभेद को समाप्त करके दोनों में सदभाव व ऐक्य स्थापित करते है। उनका ब्रम्ह, जीव, माया, जगत के सम्बन्ध मे किया गया विवेचन उल्लेखनिय है। इसमे उनकी दृष्टी सहेद व्यवहारिक व लोक कल्याण मूलक रही है । कवि के नाते तुलसी मध्यकालीन हिन्दी साहित्य के शिरोमणि है । अन्त मे हम इतना ही कह सकते है कि तुलसी व उनका साहित्य कालजयी है, आज भी जीवन संदर्भो से जुडा है और जुडा रहकर सदैव प्रेरणादायी भी रहेगा ।

● ● ●

# भावना

आठवणींच्या वादाळात भावनांच्या प्रवाहात,
सदैव तुझा कहर सुरू असतो
कल्पनांच्या विश्वात तुझ्या प्रेमाचा अभ्यास
सदैव मनात जागृत असतो
माझ्या पावण्यांवर समजलेली स्वप्नं तुझी
माझी प्रत्येक रात्र फुलवते
समुद्रा सारखी विशाल अनंत प्रीत तुझी
जीवण जगण्याचं कारण देते
अपेक्षा करतो तुझ्यासवे चालावी आयुष्याची वाट
कारण तू केली जीवनात सुखांची रम्य पहाट
माझ्या वेड्या मनाला अजुनही तुझी आस आहे
रात्रंदिवस तुझा फक्त तुझाच ध्यास आहे
तू जे काही दिलंस तेवढं मला पुरे आहे
जीवनातला एक – एक क्षण
मी मनसोक्त जगलो आहे.

– केशव गुप्ते
बी.कॉम. द्वितीय

# ज्ञानेश्वर महाराजांची काव्यदृष्टी

00

– प्रा. गणेश वाघ
शेगांव

00 00

**वाचे वे कवित्व ।**
**कवित्वो बरवे रसिकत्व।**
**रसिकत्वी परतत्व ।**
**स्पर्श जैसा ।।**

यावरून ज्ञानेश्वर महाराजांची काव्यदृष्टी किती प्रगल्भ होती, याची जाणीव होते, यादवकालीन पंडीत कवींमध्ये काव्य लिहिण्याची जी चढाओढ चालली होती यावरून काव्या विषयीची विलक्षण जिज्ञासा लक्षात येते, नरेंद्र पंडीत, रूख्मिणी स्वयंवर, वामन – पंचसुधा, श्रीधराचे रामायण या प्रत्येक कविंनी आपला विचार
काव्यमय साहित्य प्रकारातून मांडलेला आहे. काव्य हे रसात्मक असते, रसांची मांडणी ही काव्याद्वारेच होत असते, काव्यातून व्यक्त होणारे भाव हे हृदयस्पर्शी असतात म्हणूनच तर काव्याचे व्यापकात्व हे साहित्याच्या व्यापकतेत दिसून येते.

ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी हे एक गितेवरील भाष्यकाव्यच आहे गितेवर जर माऊलींनी गद्यरचना केली असती तर केली कदाचित ५–१० ग्रंथ लिहावे लागले असते, परंतु काव्यात असलेली कल्पकता, व्यापकत्व यामुळे थोड्या शब्दांमध्ये भरपूर आशय व्यक्त होतो. माऊलीचे काव्यग्रंथ हा नवरसांनी भरलेला सागरच आहे.

**नवरसा भरवी सागर।**
**करवी उचित रत्नांचे आगर**
**भावार्थाचे गीरीख।**
**निफजवो माये ।**

काव्य लिहिण्यापूर्वी हिच अपेक्षा त्यांनी आपल्या गुरूचरणी व्यक्त केली. वाचेमध्ये कवित्व पाहिजे कवित्वात रसिकत्व असावे. रसिकत्वाचा परतत्वाला स्पर्श झाला म्हणजे कोणतेही काव्य हे श्रेष्ठत्वाच्या पातळीवर निपजेल. ज्ञानेश्वरी हे

भावकाव्य 'भावार्थ दिपीका' याच नावाने श्रेष्ठत्वाच्या पातळीवर निपजले आहे यात शंका नाही. मनातील भावनेचा अर्थ त्यामध्ये समाविष्ट आहे. वाचेची मृदूता, कोमलता, काव्यातून व्यक्त करण्याचे सामर्थ्य त्यातील शब्दांनी साधले आहे. हे काव्य भावनेचा अविष्कार होतात. अंतर्मनाचे बोल होते मराठीच्या मोठेपणाचे ते बोल होते. शुद्ध मराठी भावनेतून साकार होणारे काव्य हे किती प्रतिभावंत असते याचे प्रत्यंतर त्यामधून दिसून येते. मराठी भाषेचा अभिमान निश्चितच माऊली इतका कुणाला नसेल.

**माझा मराठीची बौले कौतुके ।**
**परि अमृतातेही पैजा जिंके।**
**ऐसी अक्षरे रसिका मिळविण ।**

ही त्यांची भाषेबद्दलची महानता, हाच त्यांचा भाषेबद्दलचा अभिमान काव्याला परतत्वा पर्यंत पोहचविते. कोणतेही काव्य म्हटले की, त्यामध्ये माधुर्य, ओझ, प्रसाद ही असावेच माऊलींचे काव्य हे प्रासदिक माधुर्याने भरलेले असून त्यात ओवीही आहे. काव्याच्या या लक्षणे बरोबर त्यांच्या काव्यात नवरस आहेत. ते नवरसांनी भरलेले भांडारच आहेत. 'वाक्य रसात्मक काव्येंम' या विश्वनाथाच्या काव्याच्या व्याख्येनुरूप माऊलींनी प्रत्येक ओवीमध्ये रस हा ओतप्रोम भरलेला आहे. माऊलींच्या काव्याची कल्पकता उच्च कोटीची, उदात्त ध्येयाची होती ती कल्पकता वास्तववादी वाटणारी आहे. वास्तववादातून निर्माण झालेले कोणतेही साहित्य हे त्रिकालबाधीत असते सत्यतेच्या पातळीवर उतरणारे असते. काव्यात केवळ कल्पकता असून चालत नाही तर त्यामध्ये जीवनमूल्ये असावित. ज्ञानेश्वरीतील एक एक उदाहरण म्हणजे जीवनानुभवच वाटतो. वास्तविकतः एवढ्या कमी वयात एवढी कल्पकता कोठून आली ह्याचा तार्किक पातळीवर विचार करणे मूर्खपण ठरेल.

काव्याची गोडी चाखावी लागते. गोडी चाखली तरच त्यातील रसाची चव समजेल एकदा का त्या काव्यरसाची चव समजली की, मग त्यातून मिळणारा आनंद अलौकिक असतो. माऊलींनी त्या रसाची गोडी चाखली होती ह्याचे प्रत्यंतर सुद्धा त्यांनी दिले आहे.

**ज्ञानदेव म्हणे तरलो तरलो ।**
**आता उद्धरलो गुरूकृपे ।**

अशा ह्या अविट काव्यग्रंथाची 'एकतरी ओवी अशा अनुभवावी' असे सांगणारे नामदेव महाराज माऊलींच्या महानतेची ग्वाही देतात.

**नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ नामदेवी ।**
**एकतरी ओवी अनुभवावी ।**

माऊलींचा असा हा महान दैदिप्यमान, तेजोमय काव्यग्रंथ म्हणजे महाराष्ट्र साहित्य शारदेच्या शिरपेचात खोचलेला एक अमूल्य हिरा आहे.

# मानवतावाद

00
**प्रा.विनोद गायकवाड**
सहाय्यक प्राध्यापक ग. भि. मुरारका
महाविद्यालय, शेगांव
00 00

मानवतावादाचा सुस्पष्ट इतिहास सांगता येणे कठीण असले तरी, रानटी अवस्थेतून मानवाने कृषि अवस्था व उद्योग अवस्था यात पदार्पण केले तेव्हा त्याला आपल्या परस्पर संबंधाची, नात्यागोत्याची जाणीव झाली असावी व त्यावेळेपासूनच मानवतावादाचा उदय झाला असावा असे म्हणणे अधिक समर्थनिय ठरेल.

मानवा – मानवातील परस्परांचे संबंध वैश्विक बंधुभावाने तसेच सहकार्य व त्याग भावनेने दृढ केले जातात, त्याला मानवतावाद म्हणतात. जाती, धर्म, भाषा व भूप्रदेश यांच्या बंधनामुळे मानव मनवापासून दुरावत गेला व अनेक संघर्षाच्या विळख्यात त्याला दुःखमय जीवन जगावे लागले.

धर्म म्हणजे नीतीतत्वांचे आधारस्तंभ तेच आज मानवाचे वैरी बनले आहेत. धर्म, स्थैर्य, शांती, प्रेम, करूणा, परस्पर सद्भाव शिकवितो. पण त्याचाच नेमका अभाव आजच्या धर्मात निर्माण झाला आहे. म्हणून मानवतदावादी ज्योत विझत चालली आहे. 'युनोद्वारा' एकट्यादुकट्या संघटनेद्वारा हे कार्य पुरेसे होणार नाही म्हणून मानवतावादाकडे नेणाऱ्या मानसिक परिवर्तनाची आज निकड आहे. भारतीय तत्वज्ञान व संतपरंपरा मानवतावादाचीच शिकवण आम्हाला देत आली आहे. ज्ञानेश्वरांनी 'वसुधैव कुटुंबकम' ही वृत्ती जागविली, गुरूदेव टागोरांनी पौर्वात्य व पाश्चिमात्य मिलाप सांगितला तर विनोबांनी 'जग जगत' हे मानवाचे ध्येय सांगितले. येशू ख्रिस्तांनी आपल्याला क्रुसावर टाकणाऱ्या अज्ञानी जीवाची परमेश्वराजवळ क्षमा याचना केली. सॉक्रेटिसने कुरकूर न करता विषाचा प्याला राजाज्ञा म्हणून घशात घातला, तर महात्मा गांधींनी परचुरे शास्त्री या महारोग्याची सेवा

केली, स्वामी विवेकानंदांनी दरिद्री नारायणामध्ये परमेश्वराचे रूप पाहिले हे सर्व शास्त्रशुद्ध मानवतावादानेच घडून आले. अंधश्रद्धेचा येथे लवलेशही नाही.

प्राचीन वैदिक धर्मातील अतिरेकी तत्वाज्ञानाने सामाजिक विषमतेचे व यज्ञयागातील हिंसा व जपतप अनुष्ठानातील कठोरतेने सामाजिक असंतोषाचे बीजारोपण केले व मानवतेचा लोप केला. त्यामुळे गौतम बुद्धांचे तत्वज्ञान सर्वसामान्य जनतेकरीता मानवतावादी ठरले. गौतम बुद्ध (इ. स. पूर्व ५६३ ते ४६३) राजसुखाचा त्याग व कठोर तपश्चर्या यामुळे आदर्शवत ठरले. शांती आणि अहिंसेचा संदेश देणारा बौद्ध धर्म मानवाच्या दुःखाचा प्रतिहार करण्याचा योग मार्ग असा लोकांना प्रतित झाला म्हणून नालंदा, तक्षक्षिला व विक्रमशिला या शिक्षणकेंद्रांतून व इतर मठ विहारातून शांती व बंधुप्रेम यांचे मानवतावादी धडे घेण्याकरिता जगाच्या कानाकोपर्‍यातून अनेकांनी या केंद्राकडे धाव घेतली व आपल्याला गम्य झालेला मानवतेचा संदेश त्यांनी इतरांपर्यंत पोहचविण्याचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न केला.

बौद्ध तत्वज्ञानात, प्रज्ञा, शील व करूणा यांचा समन्वय आहे तर 'पंचशील' ही आचारणाची तत्वे आहेत. सर्वसामान्य व्यक्तीच्या दैनंदिन व्यवहारामध्ये खालील १० सिद्धांत असावे असे बौद्ध तत्वज्ञान म्हणते.

१) असत्य बोलू नये.

२) पशुंची हत्या करू नये.

३) कोणाच्याही वैयक्तीक संपत्तीची चोरी करू नये.

४) अनुचित वेळेवर भोजन घेवू नये.

५) वाईट वागणुकीला सहकार्य न करता त्यापासून दूर राहावे.

६) अतिशय जास्त सौंदर्यप्रसाधन साधने वापरू नये.

७) वस्तुच्या मालकाच्या परवानगीशिवाय त्यांच्या वस्तूंचा वापर करू नये.

८) मद्यपान व नशा आणणार्‍या वस्तूंचा वापर करू नये.

९) नृत्य, संगीत, तमाशा वगैरे कार्यक्रमांत अत्याधिक रूची दाखवून आपला वेळ खर्च करू नये.

१०) बक्षीस रूपाने सोने, चांदी, हिरे किंवा त्यांच्या वस्तूंचा स्वीकार करू नये.

बौद्ध धर्माचे तत्वज्ञान हे असे मानवाला सन्मार्गप्रवण बनविते. त्यांच्या ठिकाणी शांती, बंधुप्रेम, सहकार व त्याग भावनेचा उदय करून त्याची दृष्टी विशाल बनविते. जगातील मानव मग तो कुठल्याही देशाचा असो त्याच्यावर येणारी आपत्ती आपली आपत्ती आहे असे समजून विश्वशांतीचा संदेश देते. सहजीवन व परस्पराविषयी दृढ विश्वास यातच मानवजातीचे कल्याण समाविष्ट आहे, असे बौद्धधर्माचे मानवताहितैषी तत्वज्ञान आहे.


# वैदर्भीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे व उपाय

**शेतकरी आत्महत्येची ठळक कारणे**

**१) सिंचन सोयीचा अभाव :–**

भारतीय शेती निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असल्यामुळेचे भारतीय शेतीला जुगारांचे स्वरूप प्राप्त झाले आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात सिंचनाच्या सोयीची उपलब्धता काही प्रमाणात वाढली असली तरी सिंचनाच्या योजना राबवितांना राज्यकर्त्यांनी असमोतलाचा जाणीवपूर्वक खतपाणी घातले असल्यामुळे काही भागातील शेती आजही निसर्गाच्या पाण्यावर अवलंबून आहे. विशेषतः पश्चिम विदर्भ म्हणजे वऱ्हाड हा प्रांत राज्यातील सर्वाधिक अनुशेषग्रस्त भाग असल्याचे खालील आकडेवारी वरून स्पष्ट होते. एक हेक्टर जमीन ओलीताखाली आणण्यासाठी एक लाख दहा हजार रूपये खर्च विचारात घेवून राज्य सरकारने जून २००६ च्या खरीपातील राज्याच्या सिंचन सरासरीनुसार अनुशेषाची स्थिती व सिंचन अनुशेष असलेले टॉपटेन जिल्हे व त्यांचा अनुशेष खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | जिल्हा | सिंचन अनुशेष (कोटींत) |
|---|---|---|
| १ | अकोला वाशिम (संयुक्त) | 2499 |
| २ | अमरावती | 2347 |
| ३ | बुलडाणा | 2161 |
| ४ | औरंगाबाद | 1955 |
| ५ | यवतमाळ | 1974 |
| ६ | जालना | 1529 |
| ७ | धुळे | 1401 |
| ८ | नाशिक | 806 |
| ९ | लातूर | 717 |
| १० | रत्नागिरी | 693 |



परिणामतः शेतकऱ्यांच्या समस्या निर्मूलनाकरिता केंद्र व राज्य सरकारने दिलेल्या विशेष पॅकेज योजना केंद्र व राज्य सरकारने दिलेल्या विशेष पॅकेज योजना देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यास अपयशी ठरल्या आहेत.

**उपाय योजना :**

**१) सिंचन अनुशेष दूर करणे :**

विदर्भात बहुतेक भागात कोरडवाहू शेती केली जाते. त्यामुळे अनियमित निसर्गाचा परिणाम म्हणून दुष्काळाला सामोरे जाण्याची वेळ शेतकऱ्यांवर येते. शेतीची मुख्य समस्या ओलिताकरिता पाण्याचा अभाव ही आहे. तेव्हा विदर्भातील मोठ्या प्रमाणावर असलेला सिंचन अनुशेष दूर करून कोरडवाहू शेतकऱ्यांना सिंचनाच्या सोयी शासकीय पातळीवरून उपलब्ध करून देण्यात याव्या.

**२) अल्प व्याजदराने कर्ज पुरवठा :–**

सहकारी बँकाचे अतिरिक्त व्याजदर आणि खाजगी सावकारांशी झुंडशाही यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नातील बहुतांश भाग व्याजापोटी बँकांच्या व सावकारांच्या घरात जातो तेव्हा शासनाने सहकारी बँकामार्फत शेतकऱ्यांना अधिकतम दरसाल दर शेकडा २टक्के दरावर मोठ्या प्रमाणावर कर्ज पुरवठा केल्यास शेतकऱ्यांची खाजगी सावकाराच्या जाचातून मुक्तता होईल.

**३) कृषि उत्पादन साठविण्याची सोयी :–**

कृषि उत्पादन साठविण्याच्या सोयीचा अभाव असल्यामुळे शेतकऱ्यांना आपला माल मिळेल त्या किंमतीला व्यापाऱ्यास विकावा लागतो. परिणामतः शेतकऱ्यांना आपल्या मालाच्या उचित मूल्य प्राप्त होत नाही. **४) कर्जबाजारीपणा :–**

निसर्गाचा लहरीपणा, कृषी उत्पादनाला उचित मूल्य नसणे, तसेच लग्न समारंभामधील अवाढव्य खर्च इत्यादी कारणांमुळे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा दिवसेंदिवस वाढत पर्यायाने हाती आलेल्या उत्पादनातून कर्जाची परतफेड करण्यात उत्पादनातील अधिक हिस्सा खर्ची पडतो. बहुतांश शेतकरी खाजगी सावकारांकडून २ ते ७ टक्के दरमहा व्याज दराने शेती गहाण ठेवून कर्ज घेतो. परंतु अशा प्रकारच्या कर्जाची परतफेड करणे करणे त्याला शक्य होत नाही. परिणामतः सावकाराला गहाणात दिलेले शेत कालांतराने सावकाराला खरेदी करून द्यावे लागते. पर्यायाने उदरनिर्वाहाच्या समस्येने त्रस्त होवून त्याला नाईलाजास्तव आत्महत्या सारख्या प्रसंगांना सामोरे जावे लागते. एका सर्व्हेक्षणानुसार विदर्भातील अमरावती, अकोला, यवतमाळ, वर्धा, बुलडाणा व वाशिम या सह जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील १७ लाख शेतकरी कुटुंबापैकी जवळपास 9 लाख शेतकरी कुटुंब कर्जाच्या विळख्यात अडकलेली आहे.

**५) बँकाचे व्याज आकारणीचे अतिरिक्त दर :–**

1960 आधी तालुका बँकांनी आणि नंतर जिल्हा बँकांनी शेतकऱ्यांना कर्ज देतांना (द.सा. द.शे.) व्याजाचे दर आकारलेले आहेत. आजही व्याजाचे दर १४टक्के पेक्षा कमी नाहीत. परंतु ठेवीच्या स्वरूपात कर्जातून कपात करून घेतलेल्या रकमेवर मात्र आजतागायत सुद्धा ७. ५टक्के लाभांश देणे बंधनकारक असतांना सुद्धा लाभांश दिला गेला नाही. अशा प्रकारच्या बँकांच्या कर्जावू धोरणांमुळे शेतकरी मोठ्या प्रमाणावर नागवला गेला. उलटपक्षी सहकारी बँकांचे पदाधिकारी मात्र स्वाहाकारातून अधिक संपन्न होत गेले. मालावर अधिक नफा प्राप्त होतो. या करिता तालुका व प्रत्येक गाव पातळीवर अत्यल्प व्याज दरावर शेतकऱ्यांना कर्जे उपलब्ध करून देण्यात यावी. म्हणजे शेतकऱ्यांची व्यापाऱ्याकडून आणि खाजगी सावकारांकडून होणारी पिळवणूक होणार नाही.

–प्रा. प्रदिप भा. मेश्राम
वाणिज्य विभाग प्रमुख

# मनाच्या जीर्ण डोहात...

आपल्या नादब्रम्हात वेगाने सर्रकन डोळ्यांच्या लहानुशाक बाहुल्यांना चकवून निघून जाणारी मुंगी... आपल्या सर्वांगावर जेवढे ल्याता येतील तेवढे रंग ल्याणारं सुरवंटाला केव्हाच परागंद झालेलं तान्हुलं फुलपाखरू या अतर्क्य सृष्टीला न्याहाळू लागतं... परंतु त्यालाही चकवा देवून या आसमंतातील सारा रसरंग प्याणारा भुंगा निघतो कुठे? माहित नाही. कधी एखाद्या फांदीवर बसलेले बिचारे इटकुले–पिटकुले ओशाळवाणे पक्षी द्वय, सारे तारे, फुले, वारां, उजेड, अंधार, वेग, संथता, सारं जीवनात उतरलेलं... अशात आपल्या आईच्या बोटाला धरून आपली जागा निश्चित करून या आभाळाला आपलसं करणारं बाळ एक एक पाऊल टाकू लागते. ब-या वाईटाचं की केवळ ब-याचच माहित नाही. परंतु पडते पुन्हा पुन्हा पुढेच. कधी – कधी जमीन हादरते... एका क्षणात लहानुसं पिलू खाली पडते. तेवढ्यातच त्याचा गोड मुका घेणारी वसुंधरा खुदकन हसते. तिचं हे हसनं रविकिरणांपासूनही लपू शकत नाही. त्यासाठी हे सारे काही नव्याचे निःश्वास टाकणारे...

या सा-या जाणवणा-या गोष्टींना धरून सोडून आयुष्याचा एक टप्पा जवळ केला जातो. कधी अक्षरं खुणावतात कधी भुलवतातही. लेखनीही अस्तित्वाची सुरेल गाणी गाऊ लागते. .. आपल्यासाठी... आपलं जग मात्र अनभिज्ञनच. .. तरीही मोठी मजा असते त्यात आणि मौजेतच माणसानं जगावं हा नियतीचा पर्यायानं निसर्गाचा नियमच नाही का? कधी पुढे–पुढे जवळ येणारे मित्रही गोड वाटू लागतात. पाठीवरील दप्तर कधी नकोसं वाटू लागतं.. या सृष्टीला जणू आपल्या स्वभावात कैद करू पाहणारे गुरूजी हळू–हळू कळू लागतात. अशातच जीवनाची स्पंदनं त्यांच्याकडून काही वेचून गरम निःश्वास टाकू पाहतात... समोर उभ्या असलेल्या, तळपू पाहणाऱ्या सूर्यासाठी... दोस्तं मात्र त्याच्या उष्णतेपासून सुटून डोक्यावर दप्तरं घेऊन पळू पाहतात. परंतु कधी आतील आवाज त्या दप्तरांवर गार सावली धरायला तयार करतो. मग त्यातील आनंद पळणाऱ्यांच्या श्वासांमध्ये नसतोही बहुदा. ..

मग आपला सूर्य सरकू लागतो पुढे.

आयुष्यालाही नव्यानं पुन्हा समजावून घ्यावं लागते. तेव्हा आयुष्य आपलं नसतच मुळी. त्यावर तर कब्जाच असतो आपल्यांचाच... त्यासाठी जगावं लागतं दिवसांना. आपलं यश–अपयश बनून जाते अहंकार त्यांचा .. काही गोड क्षण खुणावतात. परंतु आतील आवाज ऐकू जात नाही आपला इतरांना... समोरच पडलेलं टपोर चांदणं, पावसाची पहिलीच सर कुणालाच न पुसता आत रिचवून ठेवणारा चातक... आपली नजर सुंदर करणारं टपोरं फूल.... परंतु पडते भूल नसण्याची... फूलं येतात कधी गळा तर कधी हात चुंबून घेतात ... यशाच्या वाटेवर... मग दिव्यांची आरास, फटाक्यांची कारंजी बेभान करून जाते. यातच कौतुकाने पाहणारे माय–बाप. जणू काही त्यांच्याचसाठी जगलो होतो मी तो क्षण... अशातच ठिपक्या ठिपक्यांनी रांगोळीची महिटा पूर्ण करणारी नवागता विलक्षण वाटते...

आयुष्यातील मुशाफिरी कुणालाच सुटत नाही. करत दूर वाळवंटात निघून रस्त्यांना सोबत करत जावं व आजुबाजूला रस्ताच असू नये. मग आपल्यालाच शोधावे लागतात रस्ते आपले... नाही का ? अशात मग रस्तेही करतात थट्टा कधी – कधी मग कशाची रोषणाई कशाचं काय ! अशात ऐनवेळी जगण्यांच रसायन आपल्यालाच तयार करावं लागतं... निदान पुढचं पाऊलं टाकण्यासाठी, कुणीतरी साद घालावी ही अपेक्षा असतेच व ती येतेही दूरवरून बिन चेहऱ्याची... तरीही चेहयांच्या भानगडीत पडायचं नसते म्हणतात. कारण दिसणारा चेहरा हा दाखवायचा की दिसण्याचा हाही एक प्रश्नच असतो.. याच्या पलिकडं माणसानं पाहिलं की, त्याला जीवनातील अतीव श्रद्धेची जाणीव होते. झाडांच्या एखाद्या फांदीवर मग दोन फुलेही डोलू पाहतात प्रेमानं.. नाही का? जीवनाचं हेच अबोल शिकवणं असतं. जगण्याच्या दोन घटका अशाही निघून जातात आणि मग निघून जातात ती दोन्ही फुलं आपापल्या वाटेनं. जी कोरू पाहत होती अंधारी क्षीतीजावर आपल्या अस्तित्वाची मरणगाणी.. परंतु ललाट रेषांना तो एकांतवास मान्य नसतोच नव्यासाठी...

वाटेनं पुढे सरकतांना जपून ठेवलेले काही क्षण माणसाला शहाणी करून सोडतात. माणसाच्या भूमीबरोबर भूमिकाही बदलतात. भूतकाळातील काही गुलाबी अल्लड गोष्टी क्षुल्लक वाटू लागतात. नाही तरी काही न करताच हातातून निसटून गेलेला प्रत्येक क्षण माणसाला क्षुल्लकच वाटतो. कारण आत्मसमाधान वर्तमानात महत्वाचं वाटते म्हणतात. एखाद वेळी रसिक – रसिक तर कधी अरसिक रसिक आयुष्याच्या वाटेवर सोबत येवून जाता– अजाणता... आणि आळवू पाहतात गीत जगण्याचं. .. नदीच्या प्रवाहातील झुळूझुळू वाहणारे पाणी थांबलेपणाला बोलकं करते. अंधारी दुलाई बाजूला सारून आपल्या असण्याची ओळख पटवून देणारी ऋणपाती अशावेळी मोठी वाटतात. सूर्य हळू–हळू कलू लागतो. आभाळाला फुटलेल्या तारकांचा भासही होवू लागतो. डोळ्यांदेखत रूजलेली फुलझाडे कला–कलाने वाढू लागतात व पुन्हा आपल्या श्वासांना येतो अहंकार, नाहीतर अभिमान म्हणा त्यांच्या फुलण्याचा.. आम्ही असे

तसे हे शब्द क्रमाने ठेवलेलेच. यातील दोन दिसाचं बळ माणसाला त्याच्या निरोपाची पहाट दाखवून जाते. पडून गेलेल्या पावसाच्या सरींचे मोजमाप माणसाने करूच नये मुळी. कारण येणारी हरेक घटका माणसाला अज्ञातात घेवून जाणारी असते...

मावळतीशी सूर्य गुजगोष्टी करतांना दिसतो. काळ्याकभिन्नराती छोटीशी पणती पेटवावी व तिनं आपल्याला मोठं करून जावं तसाच संधीप्रकाश ... वेगात येणारा खट्याळ वारा अंगाला सहज चाटून जातो. आपल्याच नादात.. एक एक पाऊल पुढे–पुढे टाकतांना आपण खूप जगल्याची जाणीव होत जाते. तिच येतीची आणि परतीची वाट, कधी घाबरवते तर कधी घाबरते.. नव्यासाठी नविनता निर्माण करणारी माणसांची जिंदगी हळू–हळू फाटू लागते व तोच फाटलेपणा जो सृजनांसाठी झटला तो आपल्यांनाच शरमेचं कारण व्हावं यासारखं दुर्भाग्य काय? एखाद्या नव्या कोऱ्या चादरीवर थिगळं लावावी आणि अभिमानानं मिरवावी व तिलाच जगणं म्हणावं हा खुळा भाव खऱ्या रोषणाईला जीवनात कधीच येवू देत नाही. अशावेळी मग पुन्हा शोधावा लागतो चांदण्यांचा प्रदेश जो प्रतिक्षेत असतो तुमच्या, माझ्या, आमच्या साऱ्यांच्या असण्याच्या...

**प्रा. विनोद इंगळे,**
**शेगांव**

# श्री संत गजानन महाराज

श्री – श्री स्वरूप दाखविणारे
स – सन्मार्ग दाखविणारे
त – तमोगुण सारणारे
ग – गणगण गणात बोते वदविणारे
जा – जाणते–अजाणते वेळी सांभाळ करणारे
न – नम्र करणारा नैतिक व धार्मिकता वाढविणारे
न – नराला नारायण करणारे
म – मनाचे दुःखहरण करणारे
हा – हात धरून चालविणारे
रा – राखण करणारे
ज – जन्म जन्माचा उद्धार करणारे
असे श्री संत गजानन महाराज होय.

कु. शुभांगी हरिदास निर्मळ
बी. कॉम. १ वर्ष

# इतिहास विभाग अहवाल सन 2017-18

इतिहासाच्या विद्यार्थ्यांच्या सहभागाद्वारे महाविद्यालयामध्ये विविध उपक्रम राबवण्यासाठी अभ्यास मंडळाचे गठन करण्यात आले. सर्वानुमते अभ्यास मंडळाची कार्यकारणी गठीत करण्यात आली.

**कार्यकारणी**

| | | |
|---|---|---|
| १) अध्यक्ष | – | बी. ए. तृतीय वर्ष |
| २)उपाध्यक्ष | – | बी. ए. तृतीय वर्ष |
| ३) सचिव | – | बी. ए. तृतीय वर्ष |
| ४) सहसचिव | – | बी. ए. तृतीय वर्ष |
| ५) कोषाध्यक्ष | – | बी. ए. तृतीय वर्ष |
| ६) प्रसिद्धी प्रमुख | – | बी. ए. तृतीय वर्ष |

**सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | – | बी. ए. द्वितीय वर्ष |
| २) | – | बी. ए. द्वितीय वर्ष |
| ३) | – | बी. ए. द्वितीय तृतीय वर्ष |
| ४) | – | बी. ए. द्वितीय तृतीय वर्ष |
| ५) | – | बी. ए. द्वितीय तृतीय वर्ष |
| ६) | – | बी. ए. द्वितीय तृतीय वर्ष |

महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी मंडळाच्या विद्यार्थ्यांनी चर्चा केली. महापुरूषांच्या जयंत्या पुण्यतिथ्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. या विषयांच्या तज्ज्ञांना आमंत्रित करावे याबाबत सर्वांचे एकमत झाले व महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांनी अशा कार्यक्रमाचे आयोजन केले. विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने सहलीचे आयोजन केले. 'चिखलदरा' 'मुक्तागिरी' यासारख्या ऐतिहासिक स्थळाला भेटी दिल्या. बी. ए. भाग दोन च्या विद्यार्थीही सहभागी होते. दि. १२ जानेवारी स्वामी विवेकानंद जयंतीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये युवा सप्ताह साजरा केला. या सप्ताहादरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये विद्यार्थी स्वयंस्फूर्तपणे सहभागी झाले. बी. ए. भाग १ च्या विद्यार्थ्यांनी चर्चासत्राचे आयोजन केले. परिक्षेचा सराव व्हावा म्हणून बी. ए. भाग एक, दोन, तीन च्या विद्यार्थ्यांच्या युनिट टेस्ट घेण्यात आल्या. स्वयंस्फूर्तपणे विद्यार्थी यात सहभागी झाले.

**अभ्यासक्रम :**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीने निश्चित केलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला. प्रत्येक घटकांचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यात आल्या. मा. प्राचार्यांनी उन्हाळी परिक्षेच्या कामाकरिता माझी केंद्रधिकारी म्हणून निवड केली ते काम पूर्ण केले. सिताबाई कला महाविद्यालय, अकोला येथे राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्याला

स्वतः उपस्थितीत होतो. रा. तु. म. नागपूर विद्यापीठ व सं. गा. बा. विद्यापीठ अमरावती संयुक्त विद्यमाने आयोजित केलेली इतिहास परिषद व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कोराडी नागपूर याला मी उपस्थित होतो. डॉ. एच. एल. सिन्हा महाविद्यालय पातूर अकोला येथे राज्यस्तरीय चर्चासत्र 'शिवकालीन सुधारणा' आयोजित करण्यात आले होते. त्याला मी उपस्थित होतो. शि. प्र. मं. चे तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय चिखली येथे एक दिवसीय राज्यस्तरीय परिषद 'श्री छत्रपती शिवाजी व संभाजीचे व्यक्तीमत्व व कार्य आयोजित करण्यात आले होते.' त्याला मी उपस्थित होतो. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा मार्च 2017 यामध्ये बैठ्यापथकामध्ये सहभागी होतो. आयोजित होणाऱ्या प्रत्येक परिषदेची माहिती विद्यार्थ्यांना दिली व विद्यार्थ्यांनी अशा परिषदांमध्ये सहभागी व्हावे यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

# वाणिज्य अभ्यास मंडळाचा अहवाल

( सत्र 2018–2019)

आमच्या महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त गुणांचा विकास व्हावा यासाठी 'वाणिज्य अभ्यास मंडळ' स्थापन करण्याचे ठरले. त्यानुसार वाणिज्य शाखेतील सर्व विद्यार्थ्यांची सभा बुधवार दि. 01/9/2018 रोजी रूम नं. 05 मध्ये आयोजित करण्यात आली होती. या सभेचा उद्देश सत्र 2018 – 2019 करिता वाणिज्य अभ्यास मंडळाची स्थापना करणे हा होता.

विद्यार्थ्यांना आपला सर्वांगीण विकास करता यावा तसेच त्यांना महाविद्यालयाच्या माध्यमातून एक स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध व्हावे या हेतूने 2018 – 2019 या सत्रातील वर्षभर चालणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन याच वेळेस करण्यात आले व सर्वानुमते खालील विद्यार्थ्यांची एक कार्यकारिणी गठीत करण्यात आली ती पुढीलप्रमाणे –

या सभेमध्ये खालील पदाधिकारी व कार्यकारी सदस्य सर्वानुमते निवडण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | : | – | बी. कॉम – ३ |
| उपाध्यक्ष | : | – | बी. कॉम – ३ |
| सचिव | : | – | बी. कॉम – २ |
| सहसचिव | : | – | बी. कॉम – २ |
| कोषाध्यक्ष | : | – | बी. कॉम – २ |
| सदस्य | : | – | बी. कॉम – २ |
| | | – | बी. कॉम – १ |
| | | – | बी. कॉम – २ |
| | | – | बी. कॉम – १ |
| | | – | बी. कॉम – १ |
| | | – | बी. कॉम – १ |
| | | – | बी. कॉम – ३ |

वरील सर्व पदाधिकारी व सदस्यांची निवड सर्वानुमते करण्यात येवून वाणिज्य अभ्यास मंडळाचे गठण करण्यात आले. अशाप्रकारे वाणिज्य अभ्यास मंडळाचे गठन करण्यात आले. या सभेला प्रा. श्री. पी. बी. मेश्राम व प्रा. श्री. के. डी. गोरे उपस्थित होते.

दिनांक 18/10/2018 रोजी वाणिज्य विद्यार्थ्यांकरिता एक निबंध स्पर्धा ठेवण्यात आली. निबंधाचा विषय 'एलपीजी धोरणाचा रोजगार निर्मितीवरील परिणाम' हे होते. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दिनांक 30/10/2018 रोजी बी. कॉम भाग 3 च्या विद्यार्थ्यांसाठी गटचर्चेचे आयोजन करण्यात आले. या गटचर्चेचा विषय 'भारतीय व्यावसायिक पर्यावरण' हा होता. या विषयावर विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. या चर्चेला प्रा. श्री. पी. बी. मेश्राम व अग्रवाल प्रा. श्री के. डी. अग्रवाल उपस्थित होते.

तसेच 'भारतीय बँकींग प्रणाली' या विषयावर गट चर्चेचे आयोजन करण्यात आले. या चर्चेला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद होता आणि विद्यार्थ्यांनी आपआपली मते विषयासंबंधी व्यक्त केली. या गटचर्चेला प्रा. श्री. पी. बी. मेश्राम व प्रा. के. डी. गोरे उपस्थित होते.

– प्रा. पी. बी. मेश्राम, वाणिज्य विभाग

# अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचा अहवाल

( सत्र 2018–2019)

बहुसंख्य विद्यार्थ्यांना 'अर्थशास्त्र' हा विषय नवनवीन परिभाषिक शब्द व संकल्पना, व्याख्या सिद्धांत, आकृत्या, प्रतिमाने (मॉडेल्स) व विविध मतमतांतरे इत्यादींमुळे काही प्रमाणात क्लिष्ट व बोजड वाटतो. विद्यार्थ्यांच्या या प्रमुख अडचणींवर मात करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये या विषयाची आवड निर्माण होण्यासाठी व देशातील नवनवीन घडामोडींची माहिती मिळविण्यासाठी आमच्या ग. भि. मुरारका महाविद्यालयातील दिनांक 9/9/2018 रोजी सर्वानुमते प्रा. कु. एस. के. बालापुरे यांच्या उपस्थितीत पुढील कार्यकारिणी घोषित करण्यात आली.

| | | | |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | : | दिपक प्रकाश गावंडे | बी. ए. ३ |
| उपाध्यक्ष | : | कु. सरिता पु. पाचपोर | बी.ए. २ |
| सचिव | : | भूषण अ. लंके | बी. ए. २ |
| उपसचिव | : | कु. भाग्यश्री डी. हिंगणे | बी. ए. ३ |
| कोषाध्यक्ष | : | राम जे. ताथोड | बी. ए. २ |
| सदस्य | : | महेश दा. शेगोकार | बी.ए. ३ |
| | | कु. दिपीका तु. टाले | बी. ए. १ |
| | | देवर्षि मि. चव्हाण | बी.ए. १ |
| | | प्रकाश रा. वाघमारे | बी. ए. २ |
| | | कु. छाया र. गाळकर | बी. ए. ३ |
| | | योगेश एस खोले | बी. ए. २ |
| | | कु. प्रज्ञा एस. कोरमकर | बी.ए. २ |
| | | राहुल रा. शेगोकार | बी. ए. १ |

प्रा. कु. एस. के. बालापुरे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख

# राष्ट्रीय सेवा योजनेचा अहवाल

(सत्र 2018 – 2019)

विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा व राष्ट्राबद्दलची कर्तव्य भावना निर्माण व्हावी या हेतूने सत्र 2018 – 19 करिता आम्ही या पथकामध्ये कला व वाणिज्य शाखेमधून इच्छूक असणाऱ्या 100 विद्यार्थ्यांना प्रवेश दिला गेला. त्यामध्ये 40 विद्यार्थी व 60 विद्यार्थिनी एन. एस. एस. बद्दलची भूमिका स्पष्ट करून दिल्यामुळे विद्यार्थी प्रेरीत होवून त्यामध्ये भाग घेण्यासाठी तयार झाले.

दि. 14 ऑगस्ट 2018 रोजी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला महाविद्यालयीन परिसरात श्रमदान करून घेण्यात आले. तसेच स्वातंत्र्यदिनाचे महत्व सांगण्यात आले. 15 ऑगस्ट 2018 रोजी रासेयोचे सर्व स्वयंसेवक ध्वजारोहण, ध्वजवंदनाकरिता महाविद्यालयामध्ये हजर होते. दि. 20 ऑगस्ट 18 रोजी 'रक्तदान श्रेष्ठदान' या विषयावर महाविद्यालयामध्ये वाद–विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दि. 27 ऑगस्ट 18 रोजी 'तरूण व राष्ट्रभक्ती' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. तसेच वृक्षारोपण करण्यात आले.

दि. 4 सप्टेंबर 18 रोजी शिक्षक दिनाच्या पूर्वसंध्येला विद्यार्थ्यांची स्वयंशासनाबद्दलची तयारी करून घेण्यात आली. दि. 5 सप्टेंबर 18 रोजी विद्यार्थ्यांनी स्वतः अध्यापन केले. तसेच दुपारच्या सत्रात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

दि. 9 ते 13 सप्टेंबर 18 या पाच दिवसांच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांनी संत गजानन महाराज संस्थान शेगांव तर्फे आयोजित कार्यक्रमामध्ये` स्वेच्छेने सहभाग नोंदविला व मिळतील ती कामे करून (झाडणे, जेवण देणे, पाणी देणे, बसायची व्यवस्था करणे, आलेल्या भक्तांना मार्ग दाखविणे तसेच स्वच्छता राखणे इ. ) रासेयो विद्यार्थी या कालावधीमध्ये आपली सेवा देत होते. दि. 14 सप्टेंबर 18 रोजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये व सभोवतालच्या परिसरामध्ये स्वच्छता अभियान राबविले. दि. 18 सप्टेंबर 18 रोजी महाविद्यालयामध्ये वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या या विषयावर विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. दि. 24 सप्टेंबर 18 रोजी रासेयो चा स्थापना दिन साजरा करण्यात आला. त्यामध्ये प्रा. विनोद इंगळे यांनी रासेयो आणि तरूणांची भूमिका यावर आपले विचार व्यक्त केले. तसेच रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व वृक्षारोपण यांचे आयोजन केले होते.

दि. 2 ऑक्टोबर 18 रोजी महात्मा गांधी जयंती निमित्त सईबाई मोटे सामान्य रूग्णालय शेगांव येथे आयोजित रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. दि. 8 ऑक्टो. 18 रोजी 'एडस् प्रतिबंधात्मक उपाय' या विषयावर मा. श्री. अजय देशमुख समुपदेशक सईबाई मोटे सामान्य रूग्णालय शेगांव यांनी आपले विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले. तसेच डॉ. ठाकूर मॅडम उपस्थित होत्या. तसेच दि. 14 ऑक्टोबर 18 रोजी सर्पमित्र कठाळणे यांचा सापांबद्दलच्या माहितीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. याला विद्यार्थ्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला.

दि. 01 डिसेंबर 18 रोजी सईबाई मोटे उपजिल्हा सामान्य रूग्णालय शेगांव येथून निघलेल्या एड्स जनजागृती रॅलीमध्ये रासेयोच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. दि. 25 डिसेंबर ते 31 डिसेंबर 18 या सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन चिंचोली येथे करण्यात आले. यामध्ये मुले व मुली एकूण 50 विद्यार्थी सहभागी झाले होते. दि. 22 जानेवारी 18 रोजी सईबाई मोटे उपजिल्हा सामान्य रूग्णालय शेगांव येथून निघालेल्या पल्स पोलिओ जनजागृती रॅलीमध्ये रासेयोच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. दि. 23 जानेवारी 18 रोजी पल्स पोलिओ निमित्य शेगांवातील प्रत्येक बुथवर दोन–दोन रासेयोच्या विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शविली. त्यांनी 0–5 वर्षापर्यंत असलेल्या प्रत्येक मुलांना दोन थेंब दिले. 26 जानेवारी 2019 रोजी सर्व स्वयंसेवक ध्वजारोहण व ध्वजवंदन यासाठी महाविद्यालयात हजर होते.

– **प्रा. प्रदीप मेश्राम**

रासेयो कार्यक्रमाधिकारी

# शारीरिक शिक्षण विभाग
# वार्षिक अहवाल

सन २०१८–१९

महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभागात विविध उपक्रम राबविले जातात. त्याकरीता साहित्य व विविध प्रकारचे खेळाचे मैदाने उपलब्ध आहेत. त्यात कबड्डी, व्हॉलीबॉल, लांब उडी, उंच उडी, क्रिकेट, बास्केट बॉल, २०० मी. ट्रॅक, टेनीक्वाईट, बुद्धीबळ व टेबल टेनीस इत्यादी मैदाने व त्याला लागणार साहित्य आहेत. या व्यतिरिक्त महाविद्यालयात व्यायामशाळा, डबलबार, सिंगलबार उपलब्ध आहेत. याचेपण प्रशिक्षण देण्यात येते.

दरवर्षी महाविद्यालयाचे संघ व्हॉलीबॉल, कबड्डी, मैदानी स्पर्धा व खो–खो इत्यादी खेळ प्रकारामध्ये अंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सहभागी होतात. यंदाच्यावर्षी बुद्धीबळ संघ झोन मध्ये तृतीय राहीला. या व्यतिरिक्त व्हॉलीबॉल व क्रिकेट संघाची कामगिरी पण समाधानकारक होती. वैयक्तिक स्पर्धेत अंतर विद्यापीठ स्तरावर बी. ए. प्रथम वर्षाचा विद्यार्थी सुनिल तु. शेगोकार हा १०० मिटर स्पर्धेत तृतीय आला. महाविद्यालयामध्ये कुंपनावर वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबवला गेला. त्यात मुले व मुले यांचा सहभाग होता. ज्यात कडुलिंबाच्या झाडावर विशेष भर देण्यात आला.

महाविद्यालयात मागील दोन वर्षापासून महाराष्ट्र पोलिस भरतीकरीता मोफत प्रशिक्षण देण्यात येत आहे. यंदा १२ विद्यार्थी पोलिस भरतीकरिता नियुक्त झाले व त्यात ते यशस्वी झाले आहेत. दरवर्षी विद्यार्थ्यांची वैद्यकीय चाचणी घेण्यात येते व त्याचा अहवाल विद्यापीठाला सादर केल्या जातो. त्याचप्रमाणे शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात येते त्याकरीता विद्यार्थ्यांचा क्रीडांगणावर सराव घेतल्या जातो. ज्यात १०० मी. धावणे, गोळाफेक, दंडबैठक, योगासन इत्यादीचे प्रशिक्षण देण्यात येते व नंतर त्यावर शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात येते. याचा अहवाल विद्यापीठात पाठविण्यात येतो.

दरवर्षी २६ जानेवारीला झेंडावंदना नंतर योग्य कर्तृत्व केलेल्या व्यक्तीस व विद्यार्थ्यांस पारीतोषिक देवून गौरविण्यात येते. या सर्व कार्याकरिता महाविद्यालयाचे संचालक मंडळ व सदस्य वेळोवेळी मदत करीत असतात. त्यात विशेष म्हणजे महाविद्यालयाचे प्राचार्य राम पांडे सर व श्रीमान सेठ संजयकुमारजी मुरारका यांचे नेहमीच सक्रीय योगदान असते. हे सांगणे काही वेगळे नाही.

**प्रा. पी. बी. गायकवाड**
शारीरिक शिक्षण संचालक






20


















ग. डि. मुरारका महाविद्यालय शेगांव
विभाग

